**<u>प्रतिवादींतर्फे सा.क्र.२ चा अतिरिक्त सरतपास – श्री. एम.यू.कानडे वकील.</u>**

**१.** आता मला दि.२०/०८ /२०१४ चा माझ्या समक्ष झालेला हक्कसोडपत्राचा मुळ दस्त दाखवला. त्यावरती वादी, प्रतिवादींचे निशाणी अंगठे व स्वाक्ष–या असून साक्षीदार म्हणून माझी व प्रभूगांवकर याची स्वाक्षरी आहे. त्याला नि.५३ देण्यात आलेले आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>वादी तर्फे उलट तपास – जी.टी.ठाकूर वकील.</u>**

**२.** माझे शिक्षण बी.कॉम पर्यंत झाले आहे. मी सन २००१ पासून पत संस्थेमध्ये खाजगी नोकरी करतो. माझी कामाची वेळ सकाळी १०.३० ते ६.०० असून रविवारी सुट्टीचा दिवस असतो. मी पत संस्थेमध्ये अकौंटंट कम क्लार्क म्हणून काम करतो. मी बँकेच्या वतीने दुय्यम निबंधक कार्यालय, सहायक निबंधक कार्यालयात जात असतो. मला त्याबाबत किती वेळा सदर कार्यालयात गेलो हे सांगता येणार नाही. मी त्या कार्यालयामध्ये संस्थेच्या वतीने गहाण करारनामा करणेकरीता जात असतो.

**३.** मला दस्तावरती साक्षीदार व ओळख देणार या एकच व्यक्ती असू शकत नाही याची माहिती आहे. मला साक्षीदार व ओळख देणार व्यक्तीमधींल फरक माहिती आहे. मी प्रतिवादींच्या दुय्यम निबंधक कार्यालयात सर्व दस्तांना हजर असतो. मला त्याबाबत प्रतिवादी क्र.१ हे माहिती देतात. मी प्रतिवादी क्र.१ ने माहिती दिल्याप्रमाणे त्यांचे दस्त करतेवेळी हजर राहात असतो.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या आईने केलेल्या वटमुखत्यार पत्राला बोलविल्यामुळे साक्षीदार म्हणून हजर राहिल्याचे खोटे सांगत आहे. मी वटमुखत्यारपत्र व हक्कसोडपत्र एकदाच पाहिले आहे. मी त्यानंतर सदर कागदपत्रे आज सोडले तर दरम्यान पाहिलेली नाहीत. मला वटमुखत्यारपत्र बाबतचा स्टॅम्प कोणी विकत घेतला याबाबत माहिती नाही. मी तो स्टॅम्प बारकाईने पाहिलेला नसल्यामुळे मला त्याबाबत आठवत नाही. त्या वटमुखत्यारपत्राला मी व प्रभूगांवकर साक्षीदार होतो. साक्षीदार पुन्हा सांगतो की, तो व अजय भोगले साक्षीदार होते. आता मला दाखवलेल्या नि.क्र. ५२ च्या वटमुखत्यार पत्रावरती साक्षीदार म्हणून माझी स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वटमुखत्यार पत्रास साक्षीदार म्हणून हजर असल्याचे खोटे सांगत आहे.

**५.** मला साक्ष देण्यासाठी न्यायाचे समन्स आलेले नाही. मी प्रतिवादी क्र.१ च्या सांगण्यावरुन साक्ष देणेसाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील माहिती प्रतिवादी नं.१ ने दिली. माझे शपथपत्र टंकलीखीत करण्यासाठी माहिती प्रतिवादी क्र.१ ने दिली होती.

**६.** या दाव्यात निता लोबो वादी असून अवधूत, उर्मिला, श्रुती, शुभदा हे प्रतिवादी आहेत. वादीचे १९९७–९८ साली झाले आहे. ती माझी वर्ग मैत्रीण नाही. माझा वादीसोबत तिच्या लग्नापासून आजपर्यंत व्यक्तीशः संपर्क आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला लग्नानंतर तिचे वडिल मयत झाल्यानंतर व आता न्यायालयात प्रथम पहात आहे. माझी व बागेवाडी वकीलांची व्यक्तीशः ओळख नाही. वादी शिवाजीनगर येथे राहाते. मला नि.५३ चे हक्कसोड पत्र करण्यासाठी वादीच्या आईने बोलविले होते. नि.५३ चे हक्कसोडपत्र दि.२०/०८/२०१४ रोजी करण्यात आले आहे. ते हक्कसोडपत्र ११.३० ते ११.४५ पर्यंत तयार करण्यात आले होते. त्यानंतर सर्वजण आपआपले कामाला निघून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२०/०८/२०१४ रोजी माझ्या नोकरीच्या ठिकाणी पूर्णवेळ हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे समक्ष कोणीही हक्कसोडपत्र लिहीण्यासाठी माहिती सांगितली नसून ते माझे समक्ष लिहीण्यात आलेले नाही.

**७.** हे म्हणणे खरे नाही की, मी दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये गेलो नाही. मी दुय्यम निबंधक कार्यालयात १२.३० पर्यंत हजर होतो. दुय्यम निबंधक कार्यालयात लिहून देणार व घेणार यांचे फोटो दस्तावरती घेतले जातात. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे दुय्यम निबंधक अधिका–यांनी कोणाकडेही विचारपूस केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने माझे समक्ष नि.क्र.५३ वरती स्वाक्षरी केलेली नाही. मी प्रतिवादी क्र.१ ने बोलविल्यास कायम त्याच्या मदतीकरीता जात असतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला मदत करण्यासाठी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

दिनांक – २४.११.२०२५.